# राज्य निवडणूक आयोग

## महाराष्ट्र

१ ला माळा, नवीन प्रशासकीय भवन, हुतात्मा राजगुरू चौक, मादाम कामा मार्ग, मुंबई- ४०० ०३२.

---

(प्रसिद्धिपत्रक) दि. १६ फेब्रुवारी २०१७.

**जिल्हा परिषदा व पंचायत समित्यांसाठी**
**प्राथमिक अंदाजानुसार ६९ टक्के मतदान**

मुंबई, दि.१६: राज्यातील १५ जिल्हा परिषदा आणि १६५ पंचायत समित्यांसाठी आज सरसरी ६९ टक्के मतदान झाल्याचा प्राथमिक अंदाज आहे. अनेक मतदान केंद्रांवर सायंकाळी उशिरापर्यंत मतदारांच्या रांगा लागल्या होत्या.

या १५ जिल्हा परिषदांच्या ८५५ आणि १६५ पंचायत समित्यांच्या १ हजार ७१२ जागांसाठी मतदान झाले. या सर्व ठिकाणी सकाळी ७.३० ते सायंकाळी ५.३० पर्यंत मतदानाची वेळ होती. गडचिरोली जिल्ह्यात मात्र सकाळी ७.३० ते दुपारी ३.०० वाजेपर्यंतच मतदानाची वेळ होती.

**प्राथमिक अंदाजानुसार जिल्हानिहाय झालेले मतदान: अहमदनगर-** ७०.८३, **औरंगाबाद-** ६६.२२, **बीड-** ६८.७३, **बुलडाणा-** ६७.३१, **चंद्रपूर-** ७१.७५, **गडचिरोली-** ७१.४५, **हिंगोली-** ७२.४९, **जळगांव-** ६४.१४, **जालना-** ७४.८०, **लातूर-** ७०.३१, **नांदेड-** ७१.६९, **उस्मानाबाद-** ७१.९४, **परभणी-** ७४.९४, **वर्धा-** ६४.९३ आणि **यवतमाळ-** ७० **एकूण सरासरी-** ६९.

0-0-0

(Jagdish More, PRO, SEC)